**राज्यातील शासकीय तसेच १०० % अनुदानित खाजगी शाळातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत...**
**अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : वैखप्र-२०२३/(१७/२३)/टीएनटी-५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२३

**वाचा :-**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दि.१९.०३.२००५
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०१६/ प्र.क्र.१६/राकावि-२, दि.१६.०३.२०१६
३) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०१५/ (५२२/१५)/टीएनटी-५, दि. २९.०४.२०१६
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१२०/राकावि-२, दि.१७.०१.२०२३

**प्रस्तावना :-**

शासकीय अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्याअनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय यामधील तरतुदींच्या अधीन राहून आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ तसेच ५ गंभीर आजारांवर रुग्णालयात घेतलेल्या उपचारांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१९.०३.२००५ च्या शासन निर्णयान्वये वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती प्रस्ताव मंजूर करण्याची कार्यवाही विहित करण्यात आलेली आहे. सदरहू शासन निर्णयास अनुसरुन शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील शासकीय तसेच १०० % अनुदानित खाजगी प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सैनिकी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अध्यापक विद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्चाचे लाभ देण्यात येतात.

२. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दि.१६.०३.२०१६ अन्वये वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मर्यादेची सुधारणा करण्यात आली असून रु.३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) पर्यंतची प्रकरणे अधिनस्त कार्यालयास व त्यावरील प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने या विभागाच्या दि.२९.०४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२,००,०००/- (रुपये दोन लाख फक्त) पर्यंतचे अधिकार शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक यांना व रु.३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) पर्यंतचे अधिकार विभाग प्रमुखांना व त्यावरील अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

३. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दि.१७.०१.२०२३ रोजीच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मर्यादेची सुधारणा करण्यात आली असून रु.३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) पर्यंतची प्रकरणांस मंजूरी देण्याचे अधिकार प्रादेशिक विभागप्रमुख यांना व रु.३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) वरील व रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) पर्यंतची प्रकरणे विभागप्रमुखांना व त्यावरील प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना मंजूरीचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

याअनुषंगाने विभागाच्या अधिनस्त वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारांबाबत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

संदर्भ क्रमांक ३ येथील दि.२९.०४.२०१६ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल), नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व वित्तीय अधिकारांत खालीलप्रमाणे बदल करण्याचा शासन निर्णय घेत आहे :-

| अ.क्र. | सक्षम अधिकारी | पूर्वीचे अधिकार | सुधारीत अधिकार |
|---|---|---|---|
| १ | अ.मु.स./प्र.स./सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई | रु.३,००,०००/- (रुपये तीन लाख) पुढील सर्व | रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख) वरील प्रकरणे |
| २ | आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे /संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक | रु.३,००,०००/- (रुपये तीन लाखापर्यंत) | रु.३,००,०००/- (रुपये तीन लाख) वरील परंतु रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख) पर्यंतची प्रकरणे |
| ३ | शिक्षणाधिकारी माध्यमिक/प्राथमिक)/ शिक्षण निरीक्षक | रु.२,००,०००/- (रुपये दोन लाखापर्यंत) | रु.३,००,०००/- (रुपये तीन लाख) पर्यंतची प्रकरणे |

२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे/संबंधित विभागीय शिक्षण उपसचांलक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक यांचे स्तरावर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना मंजूरी देताना महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल), नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतूदींची काटेकोरपणे तपासणी करुन मंजूरी देण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांना देखील लागू करण्यात यावा. तसेच यापूर्वीची निर्णयीत ठरलेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यात येऊ नये.

४. सदर शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०२२/ प्र.क्र.१२०/ राकावि-२, दि.१७.०१.२०२३ मधील परिच्छेद क्र.४ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२३०२०२१६३९०१२७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT,
2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1A39CEF3C157B9EE6A2ABE5779ACF233682613F7B9C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2023.02.02 16:45:08 +05'30'

**( तुषार महाजन )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री (सार्व.आरोग्य विभाग), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (सार्व. आरोग्य विभाग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
७) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) वित्त विभाग(कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई
१०) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर
११) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१४) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
१५) विभागीय शिक्षण उपसंचालक, (मुंबई/पुणे/कोल्हापूर/नाशिक/लातूर/अमरावती/औरंगाबाद/नागपूर)
१६) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद
१७) सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९) संचालक आरोग्य सेवा, मुंबई
२०) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
२१) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय (सर्व)
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२३) निवड नस्ती (टीएनटी-५).